# महाराष्ट्रराज्यउच्चवतंत्रशिक्षणविभागवमहाराष्ट्र राज्यमाहितीवतंत्रज्ञानसहायताकेंद्र

## यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यान्वित करिअर कट्टा उपक्रम
## करिअर कट्टा समन्वयक संवादाची शंभरी

### धुळे जिल्ह्यातील संवाद कार्यक्रमाचा अहवाल

जिल्हा :**धुळे**

समन्वयक संवाद कार्यशाळेचे स्थळ :**वेस्ट खानदेश भगिनी सेवा मंडळ संचलित कला वाणिज्य व बी.सी. ए. महिलामहाविद्यालय, देवपूर, धुळे.**


प्राचार्य, समन्वयकIQAC समन्वयाल संख्या :**३१**

महाविद्यालयीन भेटी :**०५**

विध्यार्थी संख्या: **११४०**

मान्यवर संख्या :**२८**

# महाविद्यालयीनविध्यार्थी भेटीचे छायाचित्र



महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र

व

वेस्ट खान्देश भगिनी सेवा मंडळ
संचलित कला वाणिज्य व बी.सी.ए. महिला महाविद्यालय, देवपूर, धुळे

यांच्या संयुक्त विद्यमाने

करिअर कट्ट्याचे बदललेले स्वरुप व नॅक मुल्यांकनामध्ये होणारा फायदा
या विषयावर एक दिवसीय जिल्हा स्तरीय कार्यशाळा

**- कार्यक्रमाची रूपरेषा -**

| | |
|---|---|
| कार्यक्रमाचे अध्यक्ष व उद्घाटक | : मा. मेघाताई कामेरकर |
| प्रमुख अतिथी व वक्ता | : प्राचार्य डॉ. ए.पी. खैरनार |
| प्रमुख मार्गदर्शक | : मा. यशवंत शितोळे |
| | डॉ. सचिन गोवर्धने, धुळे जिल्हा समन्वयक |
| प्रमुख अतिथी | : प्र. प्राचार्य मा. डॉ. आर.के. शिंदे |
| सुत्रसंचलन | : प्रा. राजेंद्र मुरलीधर ब्राह्मणे, |
| | करिअर कट्टा धुळे तालुका समन्वयक |
| प्रास्तविक | : डॉ. सचिन गोवर्धने, धुळे जिल्हा समन्वयक |
| आभार | : प्रा. राजेंद्र ब्राह्मणे |





## वेस्ट खानदेश भगिनी सेवा संचलित कला वाणिज्य व बी. सी.ए. महिलामहाविद्यालय, देवपूर, धुळे.



## वेस्ट खानदेश भगिनी सेवा संचलित कला वाणिज्य व बी. सीए. महिलामहाविद्यालय, देवपूर, धुळे.



# वेस्ट खानदेश भगिनी सेवा संचलित कला वाणिज्य व बी. सी.ए.महिलामहाविद्यालय, देवपूर, धुळे




विद्यावर्धिनी सभेचे  कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय धुळे




**विद्यावर्धिनी सभेचे  कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय धुळे**



**एस. एस. व्ही. पी. एस. कला आणि वाणिज्य महाविद्यालय धुळे**



एस. एस. व्ही. पी. एस. कला आणि वाणिज्य महाविद्यालय धुळे.




जयहिंद शैक्षणीक ट्रस्टझेड बी. पाटील कला विन्ज्या आणि विज्ञान महाविद्यालय धुळे.



जयहिंद शैक्षणीक ट्रस्टझेड बी. पाटील कला विन्ज्या आणि विज्ञान महाविद्यालय धुळे.



एन.एस. एस. कॅम्पस्वर्गीय अण्णासाहेब आर डी देवरे महाविद्यालय कला आणि विज्ञान महाविद्यालय म्हसदी सक्री धुळे



एन.एस. एस. कॅम्पस्वर्गीय अण्णासाहेबआर डीदेवरे महाविद्यालय कला आणि विज्ञान महाविद्यालय म्हसदी सक्री धुळे

वर्तमान पत्रातील बातम्या

## ात चाळीस
## वी घरफोडी

ा– शहरातील संत
ागरात राहणाऱ्या
फोडून चोरट्यांनी
रांचा ऐवज लंपास
रमेश गारुंगे याने
ादीनुसार मंगळवारी
ा सुमारास पंकज व
गितांजली यांच्यात
. त्यानंतर ती रागे
ोबत गावी निघून
पंकज गारुंगे त्यांच्या
लावून स्टेशन भागात
ई–वडिलांकडे गेले.
री एकच्या सुमारास
घरफोडी झाल्याचे
वाजाचा कडीकोयंडा
यांनी घरातील ३०
कड, चांदीचे पैंजण
्या बुगड्या असा ४०
वज लंपास केला.
्सात चोरट्याविरूद्ध
झाला.

## ा दुचाकी लांबवली

हरातील ऊस गल्ली
णारे व्यापारी सुनील
कर यांची दुचाकी
८ वाय ००७९)
ांबवली. या प्रकरणी
ोलिसांत गुन्हा दाखल

## तरुणांवर
## ाणा हल्ला

हर आणि तालुक्यात
वर जीवघेणा हल्ला
ाल्याच्या तक्रारी
ोंदविण्यात आल्या
गील भांडणावरुन
ा.धुळे येथे राहणाऱ्या
पाटील (वय २४) या
णावर प्रशांत छोटू
या भिलाजी पाटील,
ाटील, प्रकाश पाटील
खंडी अँगलने मारहाण
जखमी केले.

# श्री.शि.वि.प्र.संस्थेचे साहित्य व वाणिज्य महाविद्यालय धुळे येथे आठ दिवशीय स्पर्धा परीक्षा व करियर कट्टा कार्यशाळा उत्साहात



**शिंदखेडा–** उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र महाराष्ट्र शासन आणि श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे साहित्य आणि वाणिज्य महाविद्यालय धुळे अंतर्गत करियर कट्टा व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आठ दिवशीय मोफत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले दिनांक २१ मार्च रोजी श्री ईश्वर कातकडे पोलीस उप अधीक्षक धुळे यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन दीप प्रज्वलन करून व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. त्यांनी पदवी काळात यूपीएससी व एमपीएससी या स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी याविषयी मार्गदर्शन केले .या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. मनोहर पाटील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मोहन पावरा, समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रवींद्र वाघ, डॉ. मनीषा कचवे, डॉ. क्रांती पाटील, समन्वयक डॉ संभाजी पाटील प्रा आनंद पवार,प्रा संदीप भदाणे आदी उपस्थित होते.

समन्वयक डॉ. संभाजी पाटील यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील हुशार व गरीब विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षा विषयी माहिती व्हावी आणि त्यांनी स्पर्धा परीक्षेत यश संपादन करावे. यासाठी या आठ दिवसीय मोफत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. मनोहर पाटील यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी ग्रंथालयातील स्पर्धा परीक्षा पुस्तकांचे वाचन करावे व वर्तमानपत्रे वाचण्याचे आवाहनही त्यांनी केले. दिनांक २२ मार्च रोजी च्या कार्यशाळेत पोलीस उपनिरीक्षक श्री भूषण शिंदे यांनी पीएसआय, एसटीआय इतर विविध स्पर्धा परीक्षांची एकत्रित तयारी कशी करावी या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थान व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ मोहन पावरा यांनी स्वीकारून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले दि २३ मार्च रोजीच्या कार्यशाळेत डॉ भाग्यश्री पाटील वाणीज्य विभाग धुळे यांनी भारतीय अर्थव्यवस्था या विषयावर मार्गदर्शन केले. तर अध्यक्षीय भाषणात युवती सभेच्या अध्यक्षा डॉ. मनीषा कचवे यांनी मार्गदर्शन केले. दिनांक २६ मार्च रोजी युनिक अकॅडमी धुळे चे तज्ञ मार्गदर्शक प्रा. पंकज पाटील यांनी बँकेच्या परीक्षेमधून भरली जाणारी विविध पदे या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच दि २७ मार्च रोजी प्रा पंकज पाटील यांनी पदवी काळात बँकिंग विमा परीक्षा यांची तयारी कशी करावी या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधून मार्गदर्शन केले. दिनांक २८ मार्च रोजी परम करियर एकेडमी नाशिक येथील संचालक डॉ प्रशांत अहिरे यांनी स्पर्धा परीक्षेतील नियोजन व महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले तर अध्यक्षीय भाषणात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मोहन पावरा यांनी मार्गदर्शन केले. दिनांक २९ मार्च रोजी च्या कार्यशाळेत डॉ–दीपक चौधरी इंग्रजी विभाग प्रमुख धुळे यांनी संवाद साधण्यासाठी इंग्रजी भाषेचे महत्व या विषयावर मार्गदर्शन केले तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान डॉ जितेंद्र तलवारे यांनी स्वीकारून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दिनांक ३० मार्च रोजी केंद्रीय एन मुक्टोचे सचिव डॉ. जितेंद्र तलवारे यांनी भारतीय बँकिंग व्यवस्था या विषयावर मार्गदर्शन केले तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ पौर्णिमा वानखेडे यांनी मार्गदर्शन केले दिनांक १ एप्रिल रोजी या कार्यशाळेचा समारोप फ्रान्स येथील मिस पावलीना मरल यांच्या हस्ते संपन्न झाला. त्यांनी भारतीय पर्यटन अनुभव व भारतीय रूढी–परंपरा या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून मंत्रमुग्ध केले त्यांनी समारोप प्रसंगी सांगितले की, भारतात युवकांची संख्या जास्त आहे हि एक अभिमानाची गोष्ट आहे तसेच भारतात काही रूढी परंपरा व सण उत्सव च्या माध्यमातून समाजातील लोक एकत्र येऊन त्यांच्यात एकात्मता निर्माण झाल्याचे दिसून येते. महाविद्यालयाने हा उपक्रम सुरू केल्या बद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. समारोपप्रसंगी अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ मनोहर पाटील यांनी सांगितले की, भारतीय संस्कृती जगात सर्वश्रेष्ठ असून त्या संस्कृतीचे जतन करण्याचे काम आजच्या युवकांनी करावे. तसेच भविष्यात विद्यार्थ्यांना प्रशासनातील तज्ञ अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन करण्यात येईल. याचा लाभ घेण्याचे आवाहनही त्यांनी केले. समारोप प्रसंगी कार्यक्रमाच्या व्यासपीठावर अंतर्गत गुणवत्ता मूल्यांकन कक्षाचे समन्वयक डॉ संजय घोडसे ,क्रीडा संचालक डॉ नरेश बागल, डॉ. मनीषा कचवे, डॉ. भाग्यश्री पाटील समन्वयक डॉ. संभाजी पाटील आदी उपस्थित होते. आठ दिवसीय मोफत कार्यशाळा महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री उदय सामंत, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र मुंबई चे अध्यक्ष श्री यशवंत शितोळे, श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे चेअरमन आमदार श्री कुणाल पाटील, उपाध्यक्ष डॉ. संजय पाटील, उपाध्यक्ष श्री प्रफुल्ल कुमार सिसोदे, प्रशासकीय अधिकारी प्रमोद पाटील, करियर कट्टा चे विभागीय समन्वयक डॉ सचिन नांद्रे, धुळे जिल्हा समन्वयक डॉ.सचिन गोवर्धने, डॉ. राजेंद्र ब्राह्मणे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. ही कार्यशाळा यशस्वीतेसाठी प्राआनंद पवार, प्रा.संदीप भदाणे, डॉक्रांती पाटील डॉ. भैय्या पाटील, डॉ. सदाशिव सूर्यवंशी, डॉ. भाऊसाहेब देसले, प्रा.सतिलाल कंनोर, प्रा. प्रशांत वानखेडे, डॉ. कल्पना पाटील, प्रा मयूर चौधरी, कैलास जाधव, नामदेव पारखे ज्ञानेश्वर वाघ, सौरभ बिराडे, ज्ञानेश्वर खलाने, रोहित ठाकरे, महाविद्यालयातील प्राध्यापक प्राध्यापक व इतर कर्मचारी वर्ग तसेच स्वयंसेवक आणि स्वयंसेविका यांनी परिश्रम घेतले. स्पर्धा परिक्षेवर विद्यार्थ्यांसाठी मोफत आठ दिवसीय कार्यशाळा राबविणारे हे महाराष्ट्रातील एकमेव महाविद्यालय असल्याचे पाहून विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला. या कार्यशाळेला विद्यार्थ्यांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला.

लोकमत



धुळे येथे झेड. बी. पाटील महाविद्यालयात करिअर कट्टा उपक्रमाला उपस्थित विद्यार्थी आणि मार्गदर्शक.

# स्पर्धा परीक्षांची तयारी करताना 'प्लॅन बी' तयार ठेवा - यशवंत शितोळे

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे :** जीवनात कुठल्याही क्षेत्रात यश प्राप्तीसाठी ध्येय निश्चित करून ते साध्य करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक आहेत, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य करियर कट्टा समन्वयक तथा महाराष्ट्र माहिती-तंत्रज्ञान साहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांनी झेड. बी. पाटील महाविद्यालयात मार्गदर्शन करताना केले.

जयहिंद शैक्षणिक संस्था संचालित झेड. बी. पाटील महाविद्यालयास २५ मार्च रोजी महाराष्ट्र शासनातर्फे सुरू असलेल्या करियर कट्टा या उपक्रमाचे समन्वयक यशवंत शितोळे यांनी भेट दिली. त्यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. पी. एच. पवार, धुळे जिल्हा करियर कट्टा समन्वयक डॉ. सचिन गोवर्धने, धुळे तालुका करियर कट्टा समन्वयक प्रा. राजेंद्र ब्राम्हणे, साक्री तालुका करियर कट्टा समन्वयक प्रा. देवीदास भामरे व झेड. बी. पाटील महाविद्यालय करियर कट्टा समन्वयक प्रा. डॉ. प्रवीणसिंग गिरासे, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

शितोळे म्हणाले की, यापुढील काळात फक्त तुमचे गुणपत्रक किंवा प्रमाणपत्र बघीतले जाणार नाही तर प्रत्यक्ष परीक्षा व मुलाखती घेऊन निवड केली जाईल. तुमची शारीरिक, मानसिक कौटुंबिक व सामाजिक परिस्थितीचा विचार करून स्पर्धा परीक्षेची तयारी करावी. ध्येय साध्य करण्याची वेळ निच्छित करून ते साध्य होईपर्यंत सातत्यपूर्ण प्रयत्न करावेत. आयुष्यात ठरलेल्या वेळेत स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होता आले नाही तर आपला बी प्लान तयार असावा. कारण प्रयत्न करणे आपल्या हातात असते; पण वेळेवर परीक्षा होणे व निकाल लागणे आपल्या हातात नसते. यासाठी योग्य वेळेवर मार्गदर्शन मिळाले पाहिजे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन समन्वयक प्रा. डॉ. प्रवीणसिंग गिरासे यांनी केले. तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. श्रीकांत वाघ, प्रा. पूनम देवरे, प्रा. नितीन साळुंके, प्रा. गोविंद पाडवी, प्रा. लक्ष्मी पाडवी यांनी परिश्रम घेतले.

Hello Dhule
Page No. 4 Apr 08, 2022
Powered by: erelego.com



## अवतीभवती



**शिंदखेडा : शिंदखेडा महाविद्यालयात करिअर कट्टाच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. तुषार पाटील, उपप्राचार्य डॉ. बी. ए. पाटील, डॉ. एस. व्ही. बोरसे, प्रा. जितेंद्र पाटील.**

# शिंदखेडा महाविद्यालयात करिअर कट्टाचे उद्घाटन

**शिंदखेडा :** श्री.शि.वि. प्र.संस्थेचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर कट्टाचे उद्घाटन शिंदखेडा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. तुषार पाटील यांनी केले. या प्रसंगी, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बी. ए. पाटील, डॉ. एस. व्ही. बोरसे, नॅक समन्वयक डॉ. एस. बी. सावंत, कार्यालयीन अधीक्षक नरेंद्र भामरे, महाविद्यालयाचे समन्वयक प्रा. जितेंद्र पाटील उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी सुधाकर बोरसे, भटू देसले ,संभाजी पवार, अजय पवार, मोतीलाल पाटील यांनी परिश्रम घेतले.

## अभिप्राय

माननीय यशवंत शितोळे साहेबांनी धुळे जिल्ह्यातील शहरातील व आजूबाजूच्या तालुक्यातील विविध महाविद्यालयातील करियर कट्ट्याच्या टीम मध्ये उत्साह व प्रेरणा वाढविण्याचे काम केले आहे एवढेच नव्हे तर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना करियर कट्टा व या उपक्रमा अंतर्गत असलेल्या विविध उपक्रम व कोर्सचे महत्त्व पटवून सांगितले. विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविण्यासाठी करियर कट्टा या उपक्रमा अंतर्गत सुरू असलेले विविध कोर्स व त्या माध्यमातून मिळणाऱ्या रोजगार विषयक विविध संधी याविषयी विस्तृत विवेचन केले. मा. यशवंत शितोळे सरां- सारखी व्यक्ती संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढत आणि प्रत्येक ठिकाणी आवश्यकतेनुसार मुद्देसूद उर्जा पूर्ण संभाषण करते हे प्रथमच अनुभवले.

करियर कट्ट्याचे बदलते स्वरूप व NAAC मूल्यांकन यामध्ये महाविद्यालयास करिअर कट्ट्याचा होणारा फायदा या एक दिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना ते म्हणाले की करियर कट्ट्याचा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करून घेण्यासाठी उपयोग करावा असे आव्हान केले. त्यांच्या या मार्गदर्शनामुळे प्राचार्य महाविद्यालयीन करियर कट्टा समन्वयक NAAC समन्वयक तसेच विविध महाविद्यालयातील विद्यार्थी प्रभावित झाले. त्यांच्या या महाविद्यालयीन भेटीच्या दौऱ्यामुळे करियर कट्टा अधिक गतिमान होण्यास मदत होईल अशी खात्री वाटते

**Submitted to MITSC**

**Dr. Sachin Ranu Goverdhane**
**District Coordinator, Dhule**